# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्म चिंतन

**प्रा. प्रज्ञा काशिनाथ कांबळे - शिरगावकर** वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द तालुका वाळवा, जिल्हा सांगली.

---

भारतीय समाजातील धर्मचिंतनाचा विवेकनिष्ठ उत्कट अविष्कार डॉ. आंबेडकरांच्या धर्मचिंतनातून घडलेला पहावयास मिळतो. प्राचीन काळापासून चार्वाक, गौतम बुद्ध, म. महावीर या तत्त्ववेत्यांनी शोषणावर उभ्या असणाऱ्या वैदिक धर्माला विवेकनिष्ठ करून दोषमुक्त करण्याचा प्रयत्न केला. या धर्मावर कडवे हल्ले केले, पण तो पूर्णतः विवेकनिष्ठ बनवता आला नाही. या कारणानेही त्यांचे कार्य किंचित कमी मोलाचे ठरत नाही. उलट ते अधिक मार्गदर्शक आणि दिशादर्शक ठरते. पुढे याच मार्गाने म. फुले, वि.रा. शिंदे, शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर इत्यादीसह अनेकांची परंपरा शोषणाचा धर्म नाकारताना दिसते.
डॉ. आंबेडकर धर्मचिंतनाचे व्यासंगी संशोधक होते, त्यांनी जगभरातल्या अनेक धर्माचा अभ्यास केल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की धर्माची रचना शोषणावर उभारलेली असून, धर्माची मक्तेदारी मुठभर लोकांच्या हातातच आहे, असा धर्म सर्वसामान्यांच्या क्ल्याणापेक्षा त्यांचे अधिक शोषण करतो आहे, शोषण करणे हे धर्माचे उद्दिष्ट नसून, समाजाला अधिक विवेकनिष्ठ आणि विज्ञाननिष्ठ बनवणे हे धर्माचे ध्येय आहे, या तत्वापासून धर्म खूप दूर गेल्यामुळे सर्वसामान्यांच्या कल्याणाचे अपेक्षा अशा धर्माकडून करणे व्यर्थ असल्याचे त्यांना जाणवले, याच भूमिकेतून त्यांनी धर्म नाकारण्याची भूमिका घेतली, पण भारतीय माणसाला धर्माची नितांत गरज भासल्यामुळे माणसाने माणसाच्या कल्याणासाठी उभारलेला आणि मानसावरती श्रद्धा असणारा धर्म त्यांना अभिप्रेत होता.

### डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणारा धर्म :

धर्म या शब्दाचा प्राचीन अर्वाचीन काळामध्ये कालसापेक्ष परिस्थितीसापेक्ष विविध व्याख्या पहावयास मिळतात.स्थूल मानाने या विश्वाच्या मागे असलेल्या परमेश्वर अथवा परमात्मा, सृष्टी व मानव यांच्याशी असलेल्या त्याचा संबंध मानवाचे जीवित कार्य सफल करण्याचा विचार म्हणजे धर्म या संकल्पनेमध्ये सामावलेला आहे, अथवा सर्वसामान्य माणसे आपले जीवन सफल होण्यासाठी ईश्वराला शरण जातात, डॉ. आंबेडकरांना असा धर्म मान्य नसून, त्यानी धम्मा चा स्वीकार केला. 'धम्म' म्हणजे धर्माहून वेगळा असलेला सामाजिक व वैयक्तिक नीतिमत्तेवर आधारलेली जीवनसारणी, विचारसरणी म्हणजे 'धम्म' होय.

### समाजाच्या धरणेबरोबर व्यक्तीची आत्मउन्नती करतो तोच धर्म :

वैदिक धर्मशास्त्राप्रमाणे समाजाची धारणा होते, तोच खरा धर्म होय, असे धर्माचे विवेचन केलेले आहे. लो. टिळक यांनीही 'गीता रहस्य' या ग्रंथामध्ये धर्म संकल्पनेचे हेच प्रमाण मानलेले आहे, डॉ. आंबेडकरानाही 'धम्म' या संकल्पनेचा अर्थ या स्वरूपाचा अभिप्रेत आहे, या संकल्पनेच्या मर्यादा आणि व्याप्ती मांडण्याबरोबर धर्माबाबतची विवेकशील मतेही नोंदवतात. ते लिहितात, " समाजाच्या धरणेकरिता घातलेली बंधने म्हणजे धर्म ही माझी देखील कल्पना आहे. ही व्याख्या वास्तविकदृष्टया अथवा तार्किकदृष्टया योग्य दिसली तरी, समाजाच्या धारणेकरता समाजाची बंधने कशा प्रकारची असावीत, या प्रश्नाचा या व्याख्येवरून काहीच बोध होऊ शकत नाही. "१ डॉ. आंबेडकरांनी समाजाची धारणा करणारा धर्म स्वीकारत असताना समाजाच्या बंधनांची कल्पनाही अभिप्रेत केलेली आहे, जी वैदिक धर्मामध्ये पहावयास मिळत नाही, यामुळे या धर्माच्या मर्यादा नोंदवून धर्माचे स्वरूप कसे असावे याबाबतचे सखोल विवेचन केलेले आहे. समाज आणि व्यक्ती यांचे परस्पर संबंध कसे असावेत हा प्रश्न निर्माण करून आधुनिक समाजशास्त्रज्ञांनी या प्रश्नांना दिलेल्या तीन उत्तरांचाही विचार केलेला आहे. व्यक्तीच्या सुखापेक्षा तिचा विकास अधिक महत्त्वाचा मानून, व्यक्ती विकासापेक्षा आदर्श समाज निर्माण करण्याचे स्वप्न धर्म पाहतो या विवेचनामध्ये व्यक्तीच्या विकासापेक्षा तिच्या आदर्शाचा अधिकच विचार केलेला आहे अशा स्वरूपाचा धर्म त्यांना मान्य नसून " व्यक्तीच्या जीवनाला समाजाची जशी आवश्यकता असली, तरी समाजाची धारण हे धर्माचे एकमेव ध्येय होऊ शकत नाही. व्यक्तीचा विकास हे धर्माचे खरे ध्येय आहे. व्यक्तीच्या आत्मउन्नतीला पोषक असे वातावरण उत्पन्न करणे, ही धर्माची मुलभूत कल्पना आहे. समता व स्वातंत्र ही मुल्ये ज्या धर्मामध्ये असतील तोच धर्म श्रेष्ठ होय. "२ धर्माविषयी डॉ. आंबेडकरांची धारणा अगदी स्पष्ट आणि विवेकी असताना दिसून येते, धर्माच्या संकल्पनेमध्ये समाजाच्या संघटना बरोबर व्यक्ती उन्नतेचाही विचार महत्वाचा आहे. व्यक्ती उन्नातेचाही विचार महत्वाचा आहे. व्यक्ती उन्नतीचा विचार न करता समाजाच्या विकासाचा विचार केल्यास, धर्माला सनातन स्वरूप प्राप्त होऊ शकते.

### वैदिक धर्मात व्यक्तीला स्थान नाही : डॉ आंबेडकर

वैदिक धर्मामध्ये व्यक्तीपेक्षा समाज अस्तित्वाला अधिक महत्त्व दिलेले आहे. हा वैदिक धर्मातील मुख्य दोष असल्याचे त्यांनी दाखवून दिले. हे सिद्ध करताना त्यांनी विवेकी चिकित्सेच्या मार्ग-स्वीकारला.वैदिक धर्माची समाज रचना वर्णाच्या कल्पनेवर आधारलेली आहे, एका वर्णाने अथवा माणसाने दुसऱ्या वर्णाशी अथवा माणसाशी कसे वागावे याची शिकवण वैदिक धर्म देत नाही, ज्ञान, शस्त्रे आणि पैसा इत्यादींची आवश्यकता सर्वच माणसांना असते, हे जो धर्म विसरतो आणि

एकाला सज्ञान करण्यासाठी असंख्य लोकांना अज्ञानामध्ये ठेवतो. तो धर्म लोकांना बौद्धिकदृष्ट्या गुलामगिरीत ठेवण्याचा बनाव करत असतो, याबाबतचे समाजशास्त्रीय विश्लेषण करताना ते म्हणतात " जो धर्म एकाच्या हाती शस्त्र देतो व दुसऱ्याला निशस्त्र करतो, जो धर्म काहीना धनसंपदाचा मार्ग मोकळा ठेवतो व बाकीच्यांना आपली उपजीविका दुसऱ्यावर अवलंबून रहन्याची अनुज्ञा देतो तो धर्म नसून, ती स्वार्थपरायणता आहे."३ वैदिक धर्माच्या जातीव्यवस्थेच्या उतरंडीचा विचार करत असता वरच्या वर्णामध्ये जन्मलेल्या ब्राह्मणांना शिकण्याचा अधिकार देतो तर शेवटच्या वर्णामध्ये जन्मलेल्या जन्मलेल्या शूद्रांना इतरांची सेवा करायला लावून, त्यांना आपल्या विकासासाठी इतरावर तर अवलंबून ठेवलेले आहेच पण त्यांच्यावर गुलामगिरीही लादलेली आहे.

नीती मूल्यावर आधारलेला समाज निर्माण करणे हे बौध्द धर्माचे ध्येय असताना दिसून येते. माणसा माणसांमध्ये कोणताही भेदभाव न करता त्यांना उपदेश केला पाहिजे ही भूमिका आग्रहाने मांडली. पण केवळ उपदे-

शाने समाज परिवर्तन होणार नाही याचीही जाणीव तथागातांना असताना दिसून येते, आपल्या पुढील आदर्श वास्तवात उतरू शकतात याची जाणीव समाजाला अथवा व्यक्तीला झाल्यास उस्फूर्तपणाने मूल्याचा स्वीकार समाज अथवा मानव करेल ही शिकवण भिक्खू समाजाला धम्माने दिलेली आहे, यामुळेच भिक्खू संघातील कडक नियमांचे पालन करण्याची तयारी दीक्षा घेताना भिखूनी ठेवल्याचे पहावयास मिळते, या विचारांची दीक्षा देऊन तथागताचे भिक्खूंचा एक आचारधर्म पाळणारा वर्ग निर्माण केला आणि त्यांना भिक्खू संघाचे सभासद बनवले .केवळ वैराग्य प्राप्त करून अथवा शरीराला क्लेश देऊन, वास्तववादी जगाकडे पाठ फिरवून जीवन जगणे धम्माला मान्य नव्हते. दु:ख दैन्य यामध्ये अडकलेल्या लोकांच्या बाबत भिक्खूंना करुणा बाळगण्यास सांगितली, त्यांचे दु:ख नाहीसे करण्यासाठी त्यांना प्रवृत्त करण्याचा उपदेशही केला. डॉ. आंबेडकरांच्या मते भिक्खू संघ ही आदर्श समाजाची प्रतिकृती होती. आदर्श समाज उभा राहण्यासाठी भिक्खूसारखे आचरण जीवन असावे असेही त्यांनी आग्रहाने मांडलेले दिसून येते.

**धर्मांतर द्वेषातून, नव्हे विवेकातून :**

डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराकडे अनेक वेळा पूर्वग्रह नजरेतून पहिले जाते. त्यांचे धर्मांतर वैदिक धर्माच्या द्वेषाला आधारल्याचा आरोप केला जातो, मात्र हे फारसे सत्य नसल्याचा प्रत्यय येतो. त्यांचे धर्मांतर दोन पैलूंवर आधारलेले असून पहिला वैदिक धर्माचा त्याग व दुसरा बौद्ध धर्माचा स्वीकार हा होय. त्यापैकी पहिला पैलू काही प्रमाणात प्रभावी ठरला आहे. वैदिक धर्माचा त्याग केल्यामुळे हजारो वर्षांची गुलामगिरी, शोषण आणि ब्रह्मकल्पनेतून निर्माण झालेल्या गुलाम मानसिकतेतून दलित वर्गाची मुक्तता केली. पिढ्यानपिढ्या दलित वर्गाच्या वाट्याला आलेली गलिच्छ कामे त्यांनी नाकारली, अपमानित जीवनाचा त्याग केला. स्वातंत्र, निर्भय अशा मानवी जीवनाचा स्वीकार केला. ज्ञानाची लालसा त्यांच्या मनामध्ये निर्माण झाली, खेडे सोडून स्पर्धात्मक शहरांचे जीवन त्यांनी धरले, संघाचे आणि चळवळीचे महत्त्व त्यांना समजले, मानवी जीवनाच्या मुख्य प्रवाहाशी त्यांनी स्वत:ला जोडून घेतले. धम्माच्या तत्त्वज्ञानातून झालेले परिवर्तन दलित आणि अस्पृशांच्या जीवनामध्ये मनुष्यत्वाची बीजे पेरीत असताना दिसून येते. अमुलाग्र परिवर्तनाची ताकद दलित वर्गाच्या जगण्याचे सामर्थ्य बनले. यामुळे बौद्ध धर्मावरील त्यांचा विश्वास अधिक दृढ होण्यास मदत झाली, हा कार्य डॉ. आंबेडकरांच्या धर्मविषयक विचारातूनच घडताना पहावयास मिळते. आधुनिक काळातील हा वैज्ञानिक चमत्कारच म्हणावा लागेल. ज्या चमत्काराला परिवर्तनाचे व्यापक संदर्भ लाभलेले आहेत.

डॉ. आंबेडकरांनी नीतीतत्वाला धर्माची का आवश्यकता आहे हे प्रतिपादन करताना लिहितात. "सर्वसामान्य माणसे धर्मनिरपेक्ष नितीमुल्यांसाठी सहसा स्वार्थाचा त्याग करत नाहीत. नीतीला धर्माची जोड असेल तर मात्र त्या मुलांसाठी स्वत:च्या स्वार्थावर पाणी सोडण्यासाठी तयार होतात. म्हणून धर्म ही सामाजिक शक्ती आहे. "४ डॉ. आंबेडकरांनी नितीतत्वाला व वर्तनतत्वाला धर्मतत्वाचा आधार दिल्यामुळे धर्म ही भारतीय माणसाची मानसिक गरज असल्याचेच नोंदविलेले आहे. ही गरज हजारो वर्षांच्या संस्कारातून इथल्या माणसांच्या मनावर रुजली असल्यामुळे, धर्माला वजा करता माणसाला जीवन जगणे असह्य होईल असेच त्यांना वाटते त्यांच्या प्रतिपादनातील धर्म हा साह्यभूत ठरणारा घटक असून तो प्रमुख घटक नाही हेही लक्षात घेतले पाहिजे.

**निष्कर्ष व सारांश :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मचिंतनाची चिकित्सा करता त्यांनी धर्माला जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व देत असताना, धर्म हा माणसासाठी असून, धर्माने माणसाच्या कल्याणाचा विचार केला पाहिजे ही बाब आग्रहाने मांडली. धर्म तर्कदृष्टीत, विवेकशील आणि विज्ञाननिष्ठ नसेल तर त्याला व्यवहाराचे स्वरूप प्राप्त होणार नाही असेही आग्रहाने प्रतिपादन केले.

१. भारतीय समाजाची मानसिकता धर्मप्रणीत नीतीमुल्यावर आधारलेली असून समाजाच्या नियमनासाठी धर्माचा अधिक विचार केलेला आहे. धर्म विचाराशी मुठभर लोकांच्या हितसंबंधांचेही रक्षण करणारा वैदिक धर्म आपणास पहावयास मिळतो. बौद्धधर्म यापेक्षा वेगळा विचार करून समाज नियमानाबरोबर व्यक्ती स्वातंत्र्य व व्यक्तिविकास महत्वाचा मानतो.

२. एका वर्गाचे हितसंबंध जोपासणारा धर्म आणि दुसऱ्या वर्गाचे शोषण करणारा धर्म एक असू शकत नाही अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी घेतलेली आहे. शोषणावर आधारलेला धर्म त्यांनी नाकारला, मानवी प्रगतीचा आणि स्वातंत्र्याबरोबर समतेचा विचार करणाऱ्या धर्माचा स्वीकार त्यांनी केलेला दिसून येतो. बौध्द धर्म या दृष्टीने अधिक तत्त्वनिष्ठ असल्याची जाणीव बाबासाहेबांना वारंवार झाल्याचे पहावयास मिळते.

३. वैदिक धर्मासह अन्यधर्म ईश्वर प्रणीत अथवा ईश्वराच्या प्रेषितांनी निर्माण केल्याची कल्पना धर्माच्या मुळाशी असल्याचे पहावयास मिळते. पण बौध्दधर्मातील सिद्धार्थ गौतम बुद्ध आपण स्वत: माणूस असल्याचे सांगून मी तुमचा मुक्तिदाता नसून मार्गदर्शक असल्याची भूमिका घेतात. ईश्वराचा अवतार मांडण्याची भूमिका बौद्धधर्माने नाकारल्यामुळे हा धर्म बाबासाहेबांना अधिक जवळचा वाटतो याच भूमिकेतून त्यांनी या धम्माचा स्वीकार केल्याचेही पहावयास मिळते.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बौध्द धर्मातील धम्मांतर अनेक अभ्यासकांनी नोंद्वाल्याप्रमाणे द्वेष भावनेतून झालेले नसून अत्यंत विचारपूर्वक आणि विवेकी स्वरुपात झालेले आहे. शोषणाच्या व्यवस्थेतून दलितांची मुक्तता करून त्यांना स्वातंत्र्याच्या आणि ज्ञानाच्या प्रवाहात आणण्याची भूमिका या धर्मांतराच्या मुळाशी पहावयास मिळते.

**संदर्भटिपा :**

१ )डॉ. आंबेडकर ,बाबासाहेब (संपा )मा. फ . गाजरे ,बाबासाहेबांची भाषणे
महाराष्ट्र साहित्य सांस्कृती मंडळ ,मुंबई १९९९ पृ. क्र. -३४

२ )तत्रेव –पृ. क्र. -३५

३ )तत्रेव –पृ. क्र . -३५

४ )तत्रेव –पृ . क्र . -२३९